साक्षीदाराचा पुरावा वर्धा न्यायालयामधून व्हीडीओ कॉन्फरसींगव्दारे नोंदविण्यात आला.

**तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, यवतमाळ**

सत्र खटला क्र. ११७/२०२१

निशाणी क्र. ९५

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. वडगाव रोड** — **सरकारी अभियोक्ता**

..वि..

**विलास महादेव मानतुटे + १** — **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ५** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | संदिप अनंतराव मुपडे |
| वय अंदाजे ४३ वर्षे | धंदा– पोलीस निरीक्षक, ए.सी.बी. वर्धा |
| राहणार | वर्धा ता.जि. वर्धा |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०१८ मध्ये मी पोलीस उप निरीक्षक या पदावर पोलीस स्टेशन अवधुतवाडी, यवतमाळ येथे कार्यरत होतो. मला गुन्हा क्रमांक १८७६/२०१८ चा पुढील तपास मिळाला होता. या गुन्हयाचा प्राथमिक तपास श्री. एन. डी. आयरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी केला होता. मी दोंन्ही आरोपींना अटक पंचनामा निशाणी क्रमांक ८३ व ८४ नुसार अटक केली होती. मी वैद्यकिय अधिकारी, वसंतराव नाईक शासकिय रुग्णालय, यवतमाळ यांना शव विच्छेदन अहवाल मिळण्याकरीता पत्र दिले होते व त्यापत्रावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व ते पत्र **निशाणी क्रमांक ९६** वर आहे. त्यापत्रानुसार मी शव विच्छेदन अहवाल निशाणी क्रमांक ८५ प्राप्त केला होता. त्यानंतर मी तहसिलदार, यवतमाळ यांना घटनास्थळाचा रेखांकित नकाशा मिळण्याकरीता पत्र दिले होते व त्या पत्रावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व ते पत्र **निशाणी क्रमांक ९७** वर आहे. मृतक नर्मदा हिने पोलीस स्टेशनला दिलेली कैफियत निशाणी क्रमांक ५६ ही दोषारोपपत्रा सोबत दाखल आहे. मी साक्षीदारांचे बयाणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली. मी आरोपींना ओळखतो. आज आरोपी विलास न्यायालयात हजर असून त्याची आई आरोपी

सिता आज न्यायालयात हजर नाही. आरोपींच्या विरोधात सबळ पुरावा मिळून आल्यामूळे मी त्यांच्या विरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**साक्षीदाराची उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. ए. जे. तगाले यांचे मार्फत सुरु –**

२. मी साक्षीदारांची बयाणे नोंदविली होती. हे म्हणने खरे आहे की मी तुळसा सुर्यभान टाले हिचे बयाण तपासादरम्यान नोंदविले नाही. हे म्हणने खरे आहे की तुळसा टाले यांची कैफियत मी पोलीस स्टेशनमध्ये घेतली नाही. मी विठोबा वाघमारे यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. साक्षीदार विठोबा वाघमारे यांनी त्यांचे बयाण देतांना मला सांगितले नव्हते की "नर्मदाने आरोपी विलासच्या विरोधात ***मानसीक व शारीरिक त्रास देण्याबाबतची*** तक्रार दिली, तसेच "त्यानंतर आरोपी विलास हा फिर्यादी तुळसाबाई टाले यांच्याकडे गेला व तक्रार मागे घेण्याबाबत त्याने तुळसाबाईला म्हटले ", तसेच "त्रास देणार नाही",. हे म्हणने खरे नाही की मी साक्षीदारांची बयाणे त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविली नाही. हे म्हणने खरे नाही की या प्रकरणामध्ये चुकीचा तपास केला.

३. हे म्हणने खरे आहे की मृतकाने कैफियत निशाणी क्रमांक ५६ माझ्याकडे व्यक्तीशः दिला नाही. हे म्हणने खरे नाही की त्यामुळे कैफियत निशाणी क्रमांक ५६ मधील मजकूर मी सांगू शकत नाही. कैफियत निशाणी क्रमांक ५६ मी फिर्यादी तुळसाबाई हिचे कडून प्राप्त केला. हे म्हणने खरे आहे की पोलीस स्टेशनला आलेल्या कैफियतीची नोंद पोलीस स्टेशनच्या अभिलेखामध्ये असते. हे म्हणने खरे नाही की मी खोटा तपास केला व खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**उलटतपास संपला**

**फेरतपास–काही नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

दिनांक – ०१/०७/२०२६